# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/01/2024 (बुधवार) सायंकाळ

---

## सदोष मनुष्यवध घडवुन आणणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. पारशिवनी** :— दिनांक ०९/११/२०२० चे २२/२४ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सरतर्फे पोना/५७९ मनीराम नेवारे पो.स्टे. पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अप. क्र. २८५/२० कलम ३०४,२०१ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १२/१०/२०२० चे ०९/००वा. दरम्यान यातील आरोपी नामे— बापुराव गणपत मिसार वय ६९ वर्ष रा. कोंढासावळी याने आपले शेतात कोंबडयाचा कुटाराचे संरक्षणाकरीता जाळीचे कंपाउंड लावुन त्या कंपाऊंड जवळ लाकडी खुटया गाडुन त्या खुटयाला लोखंडी बारीक तार बांधुन त्या तारेला इलेक्ट्रीक करंट लावुन ठेवले असता घटना तारीख वेळी यातील मृतक नामे—प्रदीप रामराव बावने वय २८ वर्ष रा. कोंढासावळी हा आरोपीच्या शेताकडे गेला असता मृतकास इलेक्ट्रीक तारेचा करंट लागल्याने जागीच मरण पावला.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि विनायक नागुलवार यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायमुर्ती श्री. आर आर भोसले, जिल्हा व सत्र न्यायालय १० नागपूर कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १०/०१/२०२४ रोजी मा. न्यायमुर्ती श्री. आर आर भोसले, जिल्हा व सत्र न्यायालय १० नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३०४ (भाग २) मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास तसेच १,२०,०००/— रू दंड. दंड न भरल्यास ०१ वर्ष सश्रम कारावास तसेच कलम २०१ भादवि मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ०१ वर्ष साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी शेंदरे सॊा. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन मपोहवा स्मिता मोहनकर पो.स्टे. पारशिवनी यांनी मदत केली आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा गुमथळा शिवार कामठी जि. नागपुर येथे दिनांक १०/०१/२०२४ चे ०५.०० वा. ते ०५.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील पोलीस पथक पोलीस स्टेशन मौदा हद्दीत पेट्रोलींग करीत असताना मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरे वरुन काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम —३५/एच—२९४३ मध्ये **आरोपी नामे— १) सम्राट कांतीलाल येवले, वय ३१ वर्ष रा. इंदीरा नगर गोरेगाव, ता. गोरेगाव, जि. गोंदीया २) रजत साखरे, वय ३० वर्ष, रा. तुमसर, ता. गोरेगाव, जि. गोंदीया** यांनी त्याच्या ताब्यातील वाहनात ०६ बैल, ०३ गाय, ०२ गोरे असे एकुण ११ (जनावरे/गौवंश) त्यांचे तोंड दोरीने बांधून त्यांना क्लेशपणे वागणुक देवून त्यांची कोणत्याही प्रकारची चारापाण्याची व्यवस्था न करता वाहनात श्वास घेता येणार नाही अशा प्रकारे कोंबून अवैधरित्या पिकअप वाहना मध्ये भरून कत्तलीकरीता घेवून जातांना मिळून आल्याने सदर वाहनातील ११ (जनावरे/गौवंश) प्रत्येकी जनावरे किंमती १०,०००/—रू प्रमाणे एकूण १,१०,०००/—रू व महेंद्रा बोलेरो पिकअप किंमती ५,००,०००/—रू असा एकूण जनावरे व वाहन किंमती ६,१०,०००/—रू चा मुद्देमाल वाहतूक करतांना मिळुन आल्याने सदर आरोपीतांविरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम ११(१)(डी),५ए, ९ महाराष्ट्र पशु संरक्षण १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर